अेक डात

USH-MW (2001)

कार्यालयीन उपयोगासाठी

148

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

201

Type 16/020

23-8-10

# केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण तसेच शिवण यंत्राचे वाटप' या योजनेचा मुल्यमापन अहवाल


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१


१९९७
~~१९९६~~

# प्र स्ता व ना

महाराष्ट्र राज्यात निरनिराळ्या विभागात भौगोलिक व नैसर्गिक साधन संपत्तीची उपलब्धता यामध्ये भिन्नता आहे. म्हणून प्रत्येक आदिवासी विकास प्रकल्पातील भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधन संपत्ती यामध्ये तफावत आहे. त्यामुळे ठराविक साच्याचे कार्यक्रम सर्वच प्रकल्प क्षेत्रात आदिवासी विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरु शकणार नाहीत. यासाठी ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात केलेला नाही, अशा व ज्या योजना आदिवासींच्या कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालमानानुसार निकडीच्या आहेत, अशा योजना केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत (Nucleus Budget) स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे राबवून त्यांचा लाभ आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे ही या योजनेची प्रमुख संकल्पना आहे.

समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य,क्रीडा व पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या, शासन निर्णय क्र.आरएसटी-१०८०/३८५/का.१४ (१)/ दि.११ मे, १९८१ अन्वये सन १९८१-८२ या वर्षापासुन 'न्युक्लिअस बजेट' ही योजना शासनाच्या नियंत्रणाखाली प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेमार्फत राबविण्यात येते.

प्रत्येक प्रकल्प कार्यक्षेत्रातील भौगोलिक व नैसर्गिक साधन संपत्तीची उपलब्धता विचारात घेता स्थलकालानुरुप लवचिक व अभिनव कार्यक्रम स्थानिक पातळीवर तातडीने कार्यान्वित करता यावेत, या उद्देशाने तसेच तसेच ज्या योजनांचा समावेश अर्थ संकल्पात करण्यात आलेला नाही, अशा स्थानिक महत्वाच्या योजना केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येतात. तांत्रिक औपचारिकतेमुळे योजना दीर्घ काळ अडून न राहता स्थानिक पातळीवर अशा विकास योजनांची त्वरेने व प्रभावीपणे आखणी व अंमलबजावणी करता यावी, म्हणून 'न्युक्लिअस बजेट' अंतर्गत स्वतंत्र निधी प्रकल्प अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दिला जातो. सध्या राज्यात न्युक्लिअस बजेट अंतर्गत सर्वसाधारणपणे १२९ योजना

राबविण्यात येत आहेत. त्यापैकी 'आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण व शिलाई यंत्राचे वाटप' ही एक महत्वाची योजना आहे.

सध्या आदिवासी समाज हा त्यांच्यासाठी शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना व लाभांविषयी अधिक जागृत झाला आहे. तसेच, पूर्वी व सध्या राबविल्या जाणाऱ्या योजनांतही आमुलाग्र बदल घडून आला आहे. साहजिकच त्याचा परिणाम आदिवासींच्या जीवनावर झाला आहे. त्यामुळे केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत सध्या राबविल्या जाणाऱ्या योजना, या योजनांमधील आदिवासींचा सहभाग व त्यांना झालेला लाभ याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यासाठी या संस्थेने 'आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण व शिलाई यंत्राचे वाटप' या योजनेची क्षेत्रीय पाहणी करुन हा मूल्यमापन अहवाल तयार केला आहे.

सदर मूल्यमापन अहवाल या संस्थेतील श्री.मो.रा.गोसावी, सांख्यिकी अधिकारी यांनी तयार केला. श्री.सु.ज.शिंदे, संशोधन सहाय्यक यांनी क्षेत्रीय कामात श्री.गोसावी यांना मदत केली. श्री.द.मा.रासकर, उपसंचालक यांनी अहवाल तपासून आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या. मूल्यमापन अहवालाचे संपूर्ण काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. तसेच अहवालाचे डी.टी.पी.व टंकलेखनाचे काम श्री. के.पी.कुडे, लघुटंकलेखक यांनी केले.

सदर मूल्यमापन पाहणी अहवाल योजनांची आखणी व अंमलबजावणी करणारे आदिवासी विकास विभागातील प्रकल्प अधिकारी व कर्मचारी, आदिवासी विकास योजनात रस घेणारे, समाज सेवक, संशोधक इत्यादींना उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे.

पुणे

दिनांक - ३१.०३.९७

(विलासराव पाटील)
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

# अ नु क्र म णि का


| अ. क्र. | प्रकरण तपशील | | पृष्ठ क्रमांक पासून | पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १. | प्रकरण -१ | केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची संकल्पना | | |
| २. | प्रकरण -२ | शिवणकला प्रशिक्षण व शिवणयंत्र वाटप योजनेचे स्वरुप | | |
| ३. | प्रकरण -३ | मूल्यमापन अहवालाचा उद्देश व सर्वेक्षण पध्दती | | |
| ४. | प्रकरण -४ | क्षेत्रीय पाहणीतील निष्कर्ष | | |
| ५. | प्रकरण -५ | सूचना तथा शिफारशी | | |
| ६. | परिशिष्ट-अ | केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सूची | | |
| | परिशिष्ट-ब | प्रपत्र-१ लाभधारकांची माहिती | | |
| | परिशिष्ट-क | प्रपत्र-२ योजना राबविणाऱ्या यंत्रणेसाठी | | |
| | परिशिष्ट-ड | प्रपत्र-३ शिवणकाम प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेसाठी | | |

# प्रकरण क्र. १

## केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची संकल्पना

### प्रास्ताविक

१.१ महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७६२ चौ.कि.मी.असून त्यापैकी १६.५ टक्के म्हणजेच ५०,७५७ चौ.कि.मी.क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. सन १९९१ च्या जनगणनेनुसार राज्याच्या एकूण ७८९.२७ लाख लोकसंख्येपैकी आदिवासी लोकसंख्या ९.२७ टक्के म्हणजे ७३.१८ लाख होती. राज्यात भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली इ.प्रमुख आदिवासी जमाती असून कोलाम, कातकरी आणि माडिया गोंड या जमाती 'आदिम जमाती' म्हणून केंद्र शासनाने अधिसुचित केलेल्या आहेत. राज्यातील एकूण ३१ जिल्हयांपैकी १४ जिल्हयांत प्रामुख्याने आदिवासी लोकसंख्या केंद्रीत झालेली आहे. त्यापैकी सहयाद्री विभागात धुळे, जळगांव, नाशिक व ठाणे हे डोंगरी जिल्हे असून गोंडवन विभागात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व यवतमाळ हे पूर्वेकडील वनाच्छदित जिल्हे म्हणून ओळखले जातात.

राज्यातील आदिवासींची सामाजिक तसेच आर्थिक प्रगती घडविण्यासाठी तसेच आदिवासी विकासाच्या विविध योजना राबविण्यासाठी राज्यात एकूण २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये निर्माण करण्यात आली असून प्रकल्प अधिकारी या कार्यालयाचे प्रमुख म्हणून काम पाहतात. आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रात आदिवासींच्या व्यक्तीगत लाभदायी ठरणाऱ्या योजना तसेच सदर क्षेत्रातील मुलभुत सामूहिक विकास योजना या दोन्ही प्रकारच्या योजनांसाठी व्यय प्रस्तावित केला जातो. आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर राहणाऱ्या आदिवासींसाठी व्यक्तीगत लाभ देणाऱ्या योजनांसाठीच व्यय प्रस्तावित करण्यात येतो. त्यासाठी प्रत्येक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन आदिवासी उपयोजना तयार करण्यात येते. तथापि, प्रत्येक प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक गरजा भिन्न

असल्याने त्यासाठी नियमित आदिवासी उपयोजनेत निधी उपलब्ध करता येत नसल्याने केंद्रवर्ती अर्थसंकल्प (Nucleus Budget)ही संकल्पना पुढे आली.

केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची संकल्पना :-

१.२ सर्वसाधारणपणे विचार करता असे दिसून येते की, विविध ठिकाणी असलेल्या आदिवासी क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती आणि तेथे उपलब्ध असलेली साधन संपत्ती तसेच त्यातील विपुलता भिन्न असल्याने ठराविक साच्याचे किंवा सर्व प्रकल्पांकरिता एकाच प्रकारचे कार्यक्रम आदिवासींच्या विकासाच्या/उन्नतीच्या दृष्टीने उपयुक्त ठरु शकणार नाहीत. या दृष्टीकोनातून आदिवासी विकास कार्यक्रमांच्या योजनांमध्ये स्थलकालानुरुप लवचिकता व अभिनवता आणणे अत्यंत गरजेचे आहे. आदिवासी विकासाच्या दृष्टीने सुयोग्य अशा विविध कार्यक्रमांना स्थानिक पातळीवर मंजुरीचे अधिकार प्रदान करुन सदर कार्यक्रम प्रकल्प पातळीवर तातडीने कार्यान्वित करता यावेत. या हेतूने 'केंद्रवर्ती अर्थसंकल्प' (Nucleus Budget) योजना शासनातर्फे सन १९८१-८२ या वर्षापासून राबविली जात आहे. आदिवासी विकासासाठी स्थानिक परिस्थिती व तेथील आदिवासींच्या आवश्यक त्या गरजा लक्षात घेऊन ज्या योजना राबविणे अत्यावश्यक आहे, परंतु ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात केलेला नाही, अशा स्थलकालानुरुप अन नाविण्यपूर्ण स्वरुपाच्या व स्थानिक महत्वाच्या योजना केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येतात. त्यामुळे तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ काळ पडून राहणाऱ्या स्थानिक महत्वाच्या योजना तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित होतात व त्यांचा लाभ गरजू आदिवासींना मिळतो. हा या योजनेचा गाभा आहे. सदर योजना राबविण्यासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या अधिनस्त ठराविक निधी ठेवण्यात आलेला आहे. त्यास 'केंद्रवर्ती अर्थसंकल्प निधी' म्हणतात. या निधीतून कार्यान्वित करावयाच्या योजना प्रामुख्याने आदिवासी व्यक्ती व कुटुंब केंद्रबिंदू मानून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राबविण्यात येतात. म्हणून या योजनेतून मूलभूत सोयी किंवा पद निर्मिती यावर काही निर्बंध घालण्यात आलेले आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

१. या निधीतून मंजूर होणाऱ्या योजना राबविण्यासाठी कोणतीही नवीन पदे निर्माण करता येत नाही. तथापि, कार्यक्रमाचे स्वरुप किंवा योजनेचे स्वरुप लक्षात घेऊन केवळ अल्प कालावधीकरिता मानधना आधारे अत्यावश्यक तेथे काही व्यक्तींच्या सेवेचा उपयोग या कामासाठी करुन घेता येतो.

२. मूलभूत सोयी (पायाभूत सोयी) (Infrastructure Facilities)च्या निर्मितीवर येणारा खर्च अत्यंत मर्यादित स्वरुपाचा असणे आवश्यक असून केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबवावयाच्या योजनांचा एक भाग म्हणून मूलभूत सुखसोयी पुरविणे आवश्यक असल्यासच अशा मूलभूत सोयी उपलब्ध करुन दिल्या जातात. तथापि, अशा मूलभूत सोयी-सुविधांवर होणारा खर्च हा योजनेच्या एकूण खर्चाच्या १० टक्केपेक्षा जास्त असू नये.

३. न्युक्लिअस बजेटमधील योजनांमध्ये लाभार्थींना 'कर्ज देणे' अपेक्षित नाही.

केंद्रवर्ती अर्थसंकल्पातील योजनांचे स्वरुप .

१.३ न्युक्लिअस बजेट अंतर्गत घ्यावयाच्या योजनांबाबत प्रकल्प अधिकाऱ्यांनी फार मोठ्या प्रमाणावर मुभा असली तरी या योजनांचा खरा उद्देश लक्षात घेऊन या योजनांचे खाली दर्शविल्याप्रमाणे ४ प्रमुख भाग पाडण्यात आलेले आहेत. केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सूची परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आली आहे.

१.३.१ उत्पन्न निर्मितीच्या किंवा उत्पन्न वाढीच्या योजना-

या स्वरुपाच्या योजनांमध्ये सर्वसाधारणत: शेती उत्पन्न वाढविणे, लहान लहान सिंचन योजना, इनवेल ब्रोअर, सिंचनासाठी कुपनलिका, सिंचनासाठी पी.व्ही.सी.पाईप किंवा तत्सम पाईप पुरविणे, दुग्धव्यवसाय संवर्धन, पशु विकास व फळबाग विकास, मत्स्यव्यवसाय विकास, कुटीरोद्योग, हस्तकला व्यवसाय, रेशीम तथा कोसा उत्पादन, मधुमक्षिका पालन इ.विकास शीर्षाखाली वैयक्तिक लाभाच्या किंवा कौटुंबिक लाभाच्या योजनांचा समावेश होतो. सदर योजनांचे आदिवासी लाभार्थींना पुरेसे ज्ञान किंवा कौशल्य प्राप्त करुन देण्यासाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाचा व प्रात्यक्षिकांचा समावेश अशा

योजनांमध्ये होईल. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवावयाला हवी की, ज्या योजना अर्थसंकल्पात समाविष्ट असतील तर अशा योजना न्युक्लिअस बजेट अंतर्गत घेता येत नाहीत. उत्पन्न निर्मितीच्या योजना राबवितांना लाभार्थींचा काही आर्थिक सहभाग असणे आवश्यक असते.

१.३.२ प्रशिक्षणाच्या योजना

या योजनांतर्गत आदिवासी

हे प्रकरण अपूर्ण टाइप झाले आहे. 1.3.2 पासून 1.8.11 पर्यंत जे सर्व परिच्छेद हेडिंग सहित करणे आवश्यक आहे

12/6/97

प्रकरण क्र.२

# आदिवासींसाठी राबविण्यात येत असलेल्या शिवणकला प्रशिक्षण व शिवणयंत्र वाटप योजनेचे स्वरुप

केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत (Nuclues Budget) राबविण्यात येणाऱ्या अनेक योजनांपैकी "आदिवासींना शिवणकला प्रशिक्षण व शिवणयंत्राचे वाटप" ही योजना राज्यातील बहुतेक सर्व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांमार्फत राबविण्यात येत असून त्यात आदिवासींना विशेषत: महिलांचा सहभाग चांगला असल्याचे दिसून येते.

या योजनेचे वर्गीकरण करावयाचे झाल्यास दोन विभागात करता येईल. एक म्हणजे आदिवासींना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये शिवणकला कौशल्य निर्माण करणे. दुसरे असे की, त्यांना शिवणयंत्र पुरवून शिवणकाम करण्यास प्रोत्साहन देणे, जेणेकरुन त्यांना नवीन व्यवसाय उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्न निर्मितीत भर घालण्याचा प्रयत्न करणे.

विविध प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेचे उद्देश, माहिती व अटी इ.बाबतींची माहिती खालीलप्रमाणे आहे.

योजनेचे उद्देश :-

आदिवासी भागात मुळातच शिवणकाम करणारे कारागिर फार कमी असतात. शिवाय शिवणकामक्रम करणाऱ्या अशा कारागिरांच्या शिवणकामात फारशी सुबकता नसते. त्यामुळे बदलत्या जगातील नवीन पध्दतीच्या कपडे शिलाईची कामे त्यांना उपलब्ध होऊ शकत नाहीत. तसेच, त्यांच्याकडे स्वत:चे शिवणयंत्र नसल्याने त्यांना भाड्याच्या शिवणयंत्रावर शिवणकाम करुन उदरनिर्वाह करावा लागतो. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्यांमार्फत मान्यताप्राप्त शिवणकाम संस्था बहुतांशी शहरी भागात असल्याने या व्यवसायात गोडी असणाऱ्या व शहरातील शासन मान्य संस्थेतून प्रशिक्षण घ्यावयाचे झाल्यास शहरात येऊन करावयाच्या भोजनाचा व निवासाचा खर्च ही

हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे करु शकत नाहीत. यासाठी इच्छुक व पात्र असणाऱ्या आदिवासी प्रशिक्षणार्थींना दरमहा शासनामार्फत मानधन देण्यात येते. त्याचप्रमाणे प्रशिक्षणार्थींचा जेवणाचा व राहण्याचा खर्च भागविण्यासाठी त्यांना दरमहा विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षण कालावधीमध्ये लागणारा कच्चामाल घेण्यासाठी देखील त्यांना दरमहा ठराविक आर्थिक सहाय्य पुरविण्यात येते.

सर्वसाधारणपणे प्रशिक्षणाचा कालावधी सहा ते नाऊ महिने पर्यंत असतो. प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेला द्यावयाच्या मानधनाची व कच्च्या मालाच्या खरेदीची रक्कम दरमहा प्रकल्प कार्यालयामार्फत अदा करण्यात येते.

सर्वसाधारणपणे या योजनेचा लाभ घेण्यासाठी व मिळविण्यासाठी खालीलप्रमाणे अटी, शर्ती व निकष आहेत.

१. इच्छुक व पात्र उमेदवारांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्यामार्फत मान्यता असलेल्या संस्थेमार्फत शिवणकामाचे प्रशिक्षण दिले जाते.

२. प्रशिक्षणार्थींना तांत्रिक बोर्डाच्या परीक्षेला बसवावे, असे बंधन प्रशिक्षण संस्थेवर असते.

३. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्याची मान्यता असेपर्यंत अशा संस्थेस प्रशिक्षण देता येते.

४. २० प्रशिक्षणार्थ्यांसाठी अशा संस्थेला कमीत कमी १० शिवणयंत्रे स्वत : आणावी लागतात. तसेच एका शिवणयंत्रावर दोन प्रशिक्षणार्थींना शिवणकाम शिकविले जावे, हे संस्थेवर बंधनकारक असते.

५. संस्थेला प्रशिक्षणापोटी एका प्रशिक्षणार्थ्यामागे दरमहा विहित दराने मानधन देण्यात येते. (दरमहा रु.७५/- प्रमाणे)

६. संस्थेला दरमहा लाभार्थीसाठी विहित दराने कच्च्या मालाच्या (साहित्य) खर्चासाठी रक्कम देण्यात येते. (द.म.रु.१००/- प्रमाणे)

७. प्रशिक्षणार्थींची प्रगती समाधानकारक असणे आवश्यक असते. तसेच उपस्थिती ८० टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक असते.

८. प्रशिक्षणार्थ्याला प्रशिक्षण मध्येच सोडून जाता येत नाही. त्याने असे केल्यास त्याच्या कोणत्याही महिन्याच्या मानधनाची व साहित्य खरेदीची रक्कम दिली जात नाही.

९. प्रशिक्षणार्थी हा अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक असते.

१०. पूर्वी शिवण कामाचे शासनाच्या कोणत्याही योजनेंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तींनी युवतींच्या पुन्हा प्रशिक्षणासाठी निवड करता येत नाही.

११. संस्था चालकांनी उपरोक्त अटी मान्य असल्याबद्दल रुपये १०/-च्या न्यायालयीन मुद्रांकावर करारनामा करुन देणे आवश्यक असते.

१२. लाभार्थींची निवड करतांना दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येते.

१३. शिलाई प्रशिक्षण व्यवस्थित न दिल्याचे आढळून आल्यास किंवा प्रशिक्षणार्थींच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी आल्यास प्रशिक्षणासाठी मंजूर केलेली रक्कम वसूल करण्याची तरतूद करारनाम्यात असते.

१४. ज्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात आदिम जमातीचे वास्तव्य आहे तेथे आदिम जमातीच्या लोकांना प्राधान्य देण्यात येते आहे.

१५. काही प्रकल्पात ही योजना फक्त आदिवासी महिलांसाठी राबविण्यात येते. तर काही प्रकल्पांत ही योजना आदिवासी युवक तसेच युवतींसाठी देखील राबविण्यात येते.

आदिवासींना शिवणयंत्र वाटप :-

अटी/शर्ती :-

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी हा शिवणकला प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावा लागतो. या योजनेसाठी दरवर्षी पेपरमधून प्रकल्प कार्यालयामार्फत जाहिरात देण्यात येते. लाभार्थीने विहित नमुन्यात अर्ज करावयाचा असून अर्जासोबत शिवणकला परीक्षेबाबत दाखला, जमातीचे प्रमाणपत्र, लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील असल्यास दाखला इ.कागदपत्रे सादर करावी लागतात. लाभार्थीने शिवणयंत्र किंमतीच्या निम्मी रक्कम बँकेत भरल्यानंतर उषा कंपनीचे (टेलर मॉडेल) शिवणयंत्र लाभार्थींना नजिकच्या आश्रमशाळेवर बोलावून पुरविण्यात येते. आदिम जमातीच्या लाभधारकांकडून २०% रक्कम घेऊन ८० टक्के अनुदानावर शिवणयंत्र पुरविले जाते. शिवण यंत्र देण्यापूर्वी लाभार्थीकडून २० रुपयांच्या स्टॅम्पवर करारनामा घेण्यात येतो. त्यानुसार शिवणयंत्र विकता येत नाही किंवा भाड्याने देता येत नाही.

शिवणकाम प्रशिक्षण व शिलाई यंत्राचे वाटप या योजनेअंतर्गत प्रकल्प कार्यालयामार्फत करण्यात आलेला प्रत्यक्ष खर्च व लाभार्थी संख्या विषयी वर्ष-१९९४-९५

व १९९५-९६ या दोन वर्षांची माहिती प्रकल्प कार्यालयांकडून मागविण्यात आली होती. तथापि, बऱ्याच प्रकल्पांकडून सत्र १९९४-९५ ची उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने या योजनेअंतर्गत फक्त सन १९९५-९६ सालातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पनिहाय उपलब्ध झालेल्या आकडेवारीवरुन योजनेवर झालेला प्रत्यक्ष खर्च व लाभार्थी संख्या यांची माहिती पुढील तक्त्यात देण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.२.१

केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण व शिलाई यंत्र वाटप' या योजनेअंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पनिहाय झालेला खर्च व लाभार्थींची संख्या दर्शविणारा तक्ता

वर्ष :- १९९५-९६

| अ. क्र. | अपर आयुक्त कार्यालय / प्रकल्प कार्यालय | शिवणकाम प्रशिक्षण | | शिलाई यंत्र वाटप | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष खर्च | लाभार्थी संख्या | प्रत्यक्ष खर्च | लाभार्थी संख्या |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | अपर आयुक्त ठाणे | ७३१०० | ६० | ७७००० | ३५ |
| २. | शहापूर | २०७९५ | २५ | - | - |
| ३. | जव्हार | - | - | - | - |
| ४. | घोडेगांव | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ५. | डहाणू | - | - | - | - |
| ६. | पेण | ५३१०५ | ३५ | ७७००० | ३५ |
| ७. | मुंबई (गोरेगांव) | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ८. | अपर आयुक्त नाशिक | ३८०५१५ | २५४ | ३०३६६५ | १९८ |
| ९. | नाशिक | - | - | ७४४६८ | २४ |
| १०. | कळवण | २२८०० | ६० | - | - |
| ११. | यावल | - | - | ३४७८० | ३० |
| १२. | तळोदा | ९६००० | ८० | ६९५६० | ८० |
| १३. | नंदूरबार | १८१७१५ | ७४ | ७४७७७ | ४३ |
| १४. | राजूर | ८०००० | ४० | ५०००० ५००८० | २५ |

| अ. क्र. | अपर आयुक्त कार्यालय/ प्रकल्प कार्यालय | शिवणकाम प्रशिक्षण | | शिलाई यंत्रवाटप | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष खर्च | लाभार्थी संख्या | प्रत्यक्ष खर्च | लाभार्थी संख्या |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १५. | अपर आयुक्त, अमरावती | ३४४५०० | २५४ | ९०००० | ६६ |
| १६. | धारणी | - | - | - | |
| १७. | पांढरकवडा | २१४००० | २१४ | ९०००० | ६६ |
| १८. | अकोला | - | - | - | |
| १९. | औरंगाबाद | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| २०. | किनवट | १३०५०० | ४० | - | - |
| २१. | अपर आयुक्त, नागपूर | ७४६३०१ | ३४९ | ४६३६५६ | २२० |
| २२ | नागपूर | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| २३. | देवरी | २१४००० | १८९ | १५०००० | ७५ |
| २४. | चिमूर | २७६००० | ५० | ११२००० | ४५ |
| २५. | चंद्रपूर | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| २६. | गडचिरोली | १६६०५८ | ६० | १०२१५६ | ५० |
| २७. | भामरागड | ९०२४३ | ५० | ९९५०० | ५० |
| २८. | अहेरी | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| | एकूण राज्य | १५४५२१६ | ९१७ | ९३४३२१ | ५१३ |

( उ.ना. :- उपलब्ध नाही )

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सन १९९५-९६ मध्ये शिवणकाम प्रशिक्षणासाठी १७.४५ (15.45) लाख रुपये खर्च करण्यात आला व या प्रशिक्षणाचा लाभ ९१७ आदिवासी लाभार्थींनी घेतला. त्याचप्रमाणे 'शिवण यंत्र वाटप' योजनेखाली या कालावधीत ९.३४ लाख रुपये खर्च करण्यात आले व ५१३ आदिवासी लाभार्थींना शिवणयंत्राचे वाटप करण्यात आले.

या योजनेच्या मूल्यमापन अहवालाची उद्दिष्टये, व्याप्ती व सर्वेक्षण पध्दती इत्यादी विषयी सविस्तर उहापोह पुढील प्रकरणात करण्यात आला आहे.

# प्रकरण क्र.३

## मुल्यमापन अहवालाची उद्दिष्टये, व्याप्ती आणि सर्वेक्षण पध्दती

३.१ केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत (Nuclues Budget) राबविण्यात येणाऱ्या 'आदिवासींना शिवणकला प्रशिक्षण व शिवणयंत्राचे वाटप' हया योजनेचा मुल्यमापन अहवाल तयार करतांना खालील प्रमुख उद्दिष्टये ठरविण्यात आली होती.

१. 'आदिवासींना शिवणकला प्रशिक्षण व शिवणयंत्राचे वाटप' या योजनेचे स्वरुप जाणून घेणे व आदिवासी लाभार्थीवरील त्यांचा प्रभाव अजमावणे.

२. वरील योजनेतील त्रुटी तसेच योजनेची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी समजावून घेणे व त्यावर उपाय योजना सुचविणे

३. 'आदिवासींना शिवणकला प्रशिक्षण व शिवणयंत्राचे वाटप' या योजनेची फलश्रुती तपासणे.

३.२ वरील उद्देशांच्या पूर्ततेसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तसेच आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचेकडून प्राथमिक माहिती मागविण्यात आली. सन १९९४-९५ व १९९५-९६ ही आधारभूत वर्षे मानून राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच क्षेत्राबाहेरील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडून केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विषयाधीन योजनांवर झालेला एकूण खर्च व लाभार्थी संख्या [illegible] माहिती प्राप्त करण्यात आली.

३.३ या प्राप्त झालेल्या सांख्यिकी माहितीच्या आधारे तसेच संस्थेकडील सर्वेक्षणाच्या कामी उपलब्ध होणारा कर्मचारवृंद, सर्वेक्षणाचे स्वरुप, त्यासाठी लागणारा कालावधी इ.बाबी विचारात घेता ठराविक क्षेत्रातच सर्वेक्षण करण्याचे ठरविण्यात आले.

३.४ त्यानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ज्या जिल्हयांत/प्रकल्पांमध्ये योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आली, त्याची या पाहणीसाठी निवड करण्याचे ठरले.

त्याचबरोबर लाभार्थी संख्या विचारात घेऊन अधिकाधिक लाभार्थी संख्या असलेल्या प्रकल्पांची निवड कायम करण्यात आली. या निकषांनुसार यवतमाळ जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा ची पाहणी साठी निवड करण्यात आली.

३.५ उपरोक्त जिल्हयातील कमीत कमी दोन तालुके पाहणीसाठी निवडण्याचे ठरले. तालुक्यांची निवड करतांना ज्या तालुक्यात अधिकाधिक आदिवासी लाभार्थींना विषयाधीन योजनेचा लाभ देण्यात आला, अशा तालुक्यांचाच प्रामुख्याने विचार करण्याचे ठरले. त्यानुसार मा.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी पाठविलेल्या सांख्यिकी माहितीवरुन तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांच्याशी चर्चा करुन तालुक्यांची पाहणी साठी निवड करण्यात आली. त्यानुसार यवतमाळ जिल्हयातील केळापूर, मारेगांव, वणी या तालुक्यांची निवड करण्यात आली.

३.६ वरील दोन तालुक्यांतील गांवांच्या निवडीसंबंधी खालीलप्रमाणे निकष ठरविण्यात आले. ज्या गांवात योजनेंतर्गत जास्त लाभार्थींनी फायदा घेतला अशी गांवे निवडण्याचे ठरविण्यात आले. त्यात रस्त्यालगतची व दुर्गम भागातील गांवे यांचा समावेश करण्याचे ठरले. त्यानुसार रस्त्यालगतचे एक गांव रस्त्यांपासून थोड्या अंतरावरील एक गांव व दुर्गम भागातील एक गांव अशा प्रकारे गांवाची निवड करण्याचे ठरले. त्यानुसार एकूण ४ गांवांची पाहणीसाठी निवड करण्यात आली.

३.७ निवड केलेल्या गांवातील लाभार्थींची माहिती गोळा करण्यासाठी एक प्रश्नावली/प्रपत्र (Scheduled) तयार करण्यात आले. तसेच योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे योजनेसंबंधी अभिप्राय नोंदविण्यासाठी व शिवणकाम प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांसाठी देखील एक प्रपत्र तयार करण्यात आले. सदरील पत्रके परिशिष्ट २,३ व ४ मध्ये देण्यात आली आहेत.

अशाप्रकारे यवतमाळ जिल्हयातील तीन तालुक्यांतून ५२ लाभार्थींना समक्ष भेट देऊन विहित प्रपत्रात माहिती संकलित करण्यात आली. तसेच योजनेची अंमलबजावणी

करणाऱ्या अधिकाऱ्यांशी समक्ष चर्चा करुन व योजना प्रत्यक्ष राबविणाऱ्या संस्थांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याशी निगडीत असलेली माहिती विहित प्रपत्रात संकलित करण्यात आली. सदर प्रशिक्षण संस्थांची माहिती विहित प्रपत्रात संकलीत करण्यात आली.

सारांश, पाहणीसाठी निवडण्यात आलेल्या जिल्हा/तालुका/गांव व लाभार्थींची संख्या इ.बाबतची माहिती तक्ता क्र.३.१ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.३.१

क्षेत्रीय पाहणीसाठी निवडण्यात आलेला जिल्हा/तालुका/गांव/लाभार्थी संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | निवडलेल्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | गांवाची संख्या व नांवे | लाभार्थी संख्या | |
| | | | | प्रशिक्षण | यंत्रवाटप |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | यवतमाळ | १. केळापूर | १. पांढरकवडा | १७ | ४ |
| | | २. मारेगांव | १. मारेगांव | १५ | ३ |
| | | | २. कारंजी | - | ३ |
| | | ३. वणी | १. वणी | १० | — |
| | एकूण | ३ | ४ | ४२ | १० |

३.८ क्षेत्रीय पाहणी अंतर्गत एकूण ५२ लाभार्थींकडून संकलित केलेल्या माहितीचे पृथ:करण व तक्तीकरण करण्यात आले. यातून निघालेल्या निष्कर्षांचा सांगोपांग विचार पुढील प्रकरणात करण्यात आला आहे. तसेच योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांशी तसेच प्रशिक्षण संस्था चालकांशी संपर्क साधून त्यांच्याशी विचारांची सांगड योग्य त्या ठिकाणी घालण्यात आली आहे. या अहवालातील निष्कर्ष व शिफारशी मुख्यत्वे क्षेत्रीय पाहणीवरच आधारलेल्या आहेत.

## प्रकरण क्र.४

# क्षेत्रीय पाहणीतील निष्कर्ष

४.१ आदिवासींना ' शिवणकला प्रशिक्षण व शिवणयंत्राचे वाटप' ह्या योजनेच्या क्षेत्रीय पाहणीसाठी यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा प्रकल्पातील तीन तालुक्यांची निवड करण्यात आली होती. मूल्यमापन अहवालासाठी लाभार्थींकडून मूल्यमापन अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक अशी सर्वांगीण माहिती गोळा करता यावी, या दृष्टीने एक प्रपत्र तयार करुन सदरील तालुक्यांतील एकूण ५२ लाभार्थींकडून माहिती संकलित करण्यात आली. याच तालुक्यांतील शिवणकाम प्रशिक्षण देणाऱ्या ६ संस्थांची माहिती देखील स्वतंत्र प्रपत्रात संकलित करण्यात आली. याशिवाय योजना अंमलबजावणी अधिकाऱ्यांचे अभिप्राय, सूचना व अडचणी इ.वेगळया प्रपत्रात संकलित करण्यात आल्या. वर नमूद केलेल्या माहितीचे पृथ:करण करण्यात येऊन सदरील माहिती तक्ता क्र.४.१ ते ४.११ मध्ये देण्यात आलेली आहे.

४.२ दुसरे असे की, पांढरकवडा प्रकल्पात शिवणकाम प्रशिक्षण व शिवणयंत्र वाटप ही योजना वेगवेगळी राबविण्यात येत असल्याने प्रशिक्षण योजनेतील लाभार्थी तसेच शिवणयंत्र वाटप योजनेतील लाभार्थी निरनिराळे असून पहिल्या प्रकारात आदिवासी युवक/युवतींचा सहभाग असून दुसऱ्या भागात मुख्यत्वे आदिवासी महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असल्याचे आढळून आले आहे.

तक्ता क्र.४.१

शिवणकाम प्रशिक्षण व शिवणयंत्र वाटप या योजनेअंतर्गत आदिवासी लाभार्थी संख्या व त्यावर झालेला खर्च दर्शविणारा तक्ता

(एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा)

| अ. क्र. | योजनेचे नांव | वर्ष १९९५-९६ | | वर्ष १९९६-९७ | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी संख्या | खर्च रुपये | लाभार्थी संख्या | खर्च रुपये |
| १. | शिवणकाम प्रशिक्षण | २१४ | २१४००० | १५० | १२३००० (जानेवारी, ९७ अखेर) |
| २. | शिवणयंत्र वाटप | ६६ | ९०००० | * | — |
| | एकूण | २८० | ३००४००० | १५० | १२३००० (जानेवारी, ९७ अखेर) |

* पाहणीच्या तारखेपर्यंत वापट झालेले नव्हते.

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, पांढरकवडा प्रकल्पांतर्गत सन १९९५-९६ मध्ये २१४ लाभार्थींनी शिवणकाम प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतला. तथापि, सन १९९६-९७ या आर्थिक वर्षात लाभार्थींची संख्या घटून ती १५० झाली. याचे कारण जाणून घेतले असता असे समजले की अनुदान कमी प्रमाणात प्राप्त झाल्याने जास्त प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणासाठी पाठविता आले नाहीत. आदिवासीं लाभार्थींना शिवणयंत्र वाटप योजनेअंतर्गत सन १९९५-९६ मध्ये पांढरकवडा प्रकल्पांतर्गत ६६ आदिवासींना ५० टक्के अनुदानावर उषा (टेलर मॉडेल) शिलाई यंत्रे पुरविण्यात आली. कोलाम जमातीसाठी अनुदान मर्यादा ८० टक्के इतकी आहे. पाहणीच्या काळात सन१९९६-९७ च्या वाटपासाठी आलेल्या अर्ज छाननीचे काम सुरु होते.

तक्ता क्र.४.२

सन १९९६-९७ साली एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा या कार्यालयामार्फत शिवणकाम प्रशिक्षण या योजनेअंतर्गत विविध ठिकाणच्या प्रशिक्षण संस्थांत पाठविण्यात आलेल्या आदिवासी प्रशिक्षणार्थींची माहिती दर्शविणारा तक्ता

वर्ष :- १९९६-९७

| अ. क्र. | प्रशिक्षण संस्था असलेल्या ठिकाणाचे नांव | प्रशिक्षण संस्थांची संख्या | प्रशिक्षणार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण |
| १. | पांढरकवडा | ४ | - | ४० | ४० |
| २. | मारेगांव | ३ | - | ३० | ३० |
| ३. | वणी | ३ | ८ | २२ | ३० |
| ४. | शिरपूर | १ | - | १० | १० |
| ५. | यवतमाळ | ३ | - | ३० | ३० |
| ६. | कळंब | १ | - | १० | १० |
| | एकूण | १५ | ८ | १४२ | १५० |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा कार्यालयामार्फत पंधरा शिवणकला प्रशिक्षण, आदिवासी मुलींचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते. या प्रशिक्षण

वर्गासाठी आदिवासी मुलांचे प्रमाण अतिशय अल्प म्हणजे फक्त ५ टक्के आढळले. फक्त वणी येथील शिवणकला प्रशिक्षण केंद्रात आठ आदिवासी प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आला असल्याचे दिसून येते. तर उर्वरित प्रशिक्षण केंद्रात एकाही आदिवासी युवकांचा सहभाग नसल्याचे निदर्शनास येते.

तक्ता क्र.४.३

आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण या योजनेअंतर्गत प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा यांचे कार्यालयामार्फत पाठविण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींची शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गवारी

(वर्ष :- १९९६-९७)

| अ. क्र. | प्रशिक्षण संस्था असलेल्या ठिकाणाचे नांव | प्रशिक्षण संस्थांची संख्या | शैक्षणिक पात्रतेनुसार लाभार्थींची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | इ.७ वी ते १० वी पास पर्यंत शिकलेले | इ.११ वी पास झालेले | इ.१२ वी पास झालेले | एकूण |
| १. | पांढरकवडा | ४ | ३९ | १ | - | ४० |
| २. | मारेगांव | ३ | २८ | २ | - | ३० |
| ३. | वणी | ३ | २६ | ३ | १ | ३० |
| ४. | शिरपूर | १ | ८ | १ | १ | १० |
| ५. | यवतमाळ | ३ | ३० | - | - | ३० |
| ६. | कळंब | १ | १० | - | - | १० |
| | एकूण | १५ | १४१ | ७ | २ | १५० |

शिवणकाम प्रशिक्षण केंद्रात प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थींची शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गवारी तपासली असता असे दिसून येते की, इयत्ता ७ वी ते १० वी पर्यंत शिक्षण असणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाण फार मोठे असून त्यापेक्षा जास्त शैक्षणिक पातळी असणाऱ्यांचे प्रमाण अल्प आढळले. इयत्ता ७ वी पेक्षा कमी कमी शिक्षण असणाऱ्यांचे प्रमाणात पाहणीत नगण्य आढळले. याची प्रमुख कारणे असे देण्यात आले की, ७ वी पेक्षा कमी शिक्षण असणाऱ्यांचे गणितातील ज्ञान तुलनेने कमी असल्याने त्यांना कपड्याचे मोजमाप तंतोतंत घेऊन त्युनसार कापड फाडणे व कपडे शिवणे इ.बरोबर प्रमात नसल्याने त्यांना प्रशिक्षणासाठी शक्यतो पाठविले जात नाही. त्याचप्रमाणे १० वी पेक्षा जास्त गुणवत्ता असणारे विद्यार्थी शिवणकाम प्रशिक्षणाकडे फारसे आकृष्ट न होता ते इतर

प्रशिक्षण वर्गाकडे म्हणजे टायपिंग, कॉम्प्युटर क्लास इ.कडे वळत असल्याचे संबंधितांकडून समजले. त्यामुळे विषयाधीन योजनेत त्यांचा सहभाग अल्प आहे.

तक्ता क्र.४.४

आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण या योजनेअंतर्गत प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा यांचे कार्यालयामार्फत पाठविण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींची जमातनिहाय वर्गवारी

वर्ष-१९९६-९७

| अ. क्र. | प्रशिक्षण संस्था असलेल्या ठिकाणाचे नांव | प्रशिक्षण संस्थांची संख्या | जमातनिहाय प्रशिक्षणार्थींची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गोंड | कोलाम | परधान | आंध | एकूण |
| १. | पांढरकवडा | ४ | १६ | ६ | १८ | - | ४० |
| २. | मारेगांव | ३ | ११ | ११ | ८ | - | ३० |
| ३. | वणी | ३ | ९ | - | २१ | - | ३० |
| ४. | शिरपूर | १ | ४ | - | ६ | - | १० |
| ५. | यवतमाळ | ३ | १५ | ३ | १० | २ | ३० |
| ६. | कळंब | १ | ५ | ३ | २ | - | १० |
| | एकूण | १५ | ६० | २३ | ६५ | २ | १५० |

पांढरकवडा प्रकल्प कार्यालयामार्फत पाठविण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींची वरील जमातनिहाय वर्गवारी तपासली असता असे दिसते की, या योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये परधान व गोंड जमातीच्या उमेदवारांची संख्या जास्त असून त्यांची टक्केवारी अनुक्रमे ४३ व ४० इतकी येते. योजनेचा लाभ घेतलेल्या कोलाम व आंध उमेदवारांची टक्केवारी अनुक्रमे १५ व १ अशी येते.

थोडक्यात पांढरकवडा प्रकल्पांतर्गत वरील चार जमातींच्या उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेतला असून त्यात परधान व गोंड जमातीचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. वरील चार जमाती व्यतिरिक्त इतर जमातींचा सहभाग शिवणकाम प्रशिक्षण योजनेत आढळला नाही.

तक्ता क्र.४.५

आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षणाच्या योजनेअंतर्गत प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा प्रकल्पातील लाभ घेतलेल्या आदिवासी लाभार्थींची तालुकानिहाय वर्गवारी

| अ. क्र. | तालुका | योजनेचे नांव | |
|---|---|---|---|
| | | शिवणकाम प्रशिक्षण योजनेतील लाभार्थी संख्या (१९९६-९७) | शिलाईयंत्र वाटप योजनेतील लाभार्थी संख्या (१९९६-९७) |
| १. | केळापूर | ३३ | ३१ |
| २. | यवतमाळ | २३ | १७ |
| ३. | मारेगांव | ३३ | ५ |
| ४. | वणी | ३७ | ४ |
| ५. | कळंब | ११ | - |
| ६. | घाटंजी | २ | १ |
| ७. | झरी | ९ | १ |
| ८. | राळेगांव | - | २ |
| ९. | दिग्रस | - | १ |
| १०. | आर्णी | १ | १ |
| ११. | दारव्हा | १ | (३) — |
| १२. | पुसद | - | ३ |
| एकूण | | १५० | ६६ |

वरील योजनेत समाविष्ट असलेल्या लाभार्थींची तालुकानिहाय वर्गवारी तपासली असता शिवणकाम प्रशिक्षणासाठी केळापूर, यवतमाळ, मारेगांव व वणी या चार तालुक्यातील लाभार्थींचा सहभाग चांगला (८४%) असून उर्वरित तालुक्यातील लाभार्थींचा सहभाग कमी (१६%) असल्याचे दिसून येते. शिलाई यंत्र वाटप योजनेत केळापूर, यवतमाळ तालुक्यातील लाभार्थींचा सहभाग जास्त (७३%) असून उर्वरित दहा तालुक्यांचा सहभाग अल्प (२७%) असल्याचे स्पष्ट होते.

दुसरे असे की, वरील दोन्ही योजना वेगवेगळया राबविण्यात येत असून 'शिवणकाम प्रशिक्षणासाठी' तसेच 'शिलाई यंत्रासाठी' आदिवासी महिलांचीच मागणी मोठी असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.४.६

'आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण' या योजनेअंतर्गत सर्वेक्षण केलेल्या शिवणकाम प्रशिक्षण संस्थांची माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | संस्थेचे नांव | संस्थेचा प्रकार | संस्थेच्या जागेचे क्षेत्रफळ (चौ.फू.) | संस्थेमध्ये असलेल्या शिलाई मशिनची संख्या | प्रशिक्षणार्थी ([illegible]) | | प्रशिक्षक संख्या | परीक्षेचा प्रकार | प्रशिक्षणाची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एकूण | पैकी आदिवासी | | | | |
| १. | अभय शिवणकला विद्यालय, पांढरकवडा | मान्यताप्राप्त | ५६० | ५ | ३५ | १० | १ | संस्थेमार्फत | ६ महिने | |
| २. | रेणूका शिवणकला विद्यालय, पांढरकवडा | खाजगी | ५०० | २ | २७ | १० | १ | संस्थेमार्फत | ६ महिने | |
| ३. | नवयुवक बहुउद्देशीय संस्था, पांढरकवडा | खाजगी | ५०० ८०० | २ | १२ | १० | १ | संस्थेमार्फत | ६ महिने | |
| ४. | प्रेरणा प्रशिक्षण संस्था, मारेगांव | मान्यताप्राप्त | ६७५ | १३ | २२ | ७ | १ | संस्थेमार्फत | ६ महिने | |
| ५. | भारत यांत्रिकी विद्यालय, वणी | मान्यताप्राप्त | ८०० | ६ | ३५ | १४ | १ | संस्थेमार्फत | ६ महिने | |
| ६. | आदित्य तांत्रिक विद्यालय, मारेगांव | मान्यताप्राप्त | ३५० | ४ | ५ | ७ | १ | संस्थेमार्फत | ६ महिने | |
| ७. | वंदना [illegible] विद्यालय, [illegible] | खाजगी | - | - | - | - | - | - | - | पाहणी काळात बंद होते. |

वरील तक्तत्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, सातपैकी चार संस्था मान्यताप्राप्त असून तीन संस्था खाजगी आहेत. पाहणी काळात एक संस्था बंद होती. दुसरे असे की, सर्व संस्थांकडील प्रशिक्षण सत्राचा कालावधी सहा महिन्यांचा असल्यामुळे प्रशिक्षणार्थींना शासकीय परीक्षेस बसविता येत नाही. कारण त्यासाठी १० ते १२ महिन्याचा प्रशिक्षण कालावधी लागतो. संस्थामार्फतच परीक्षा घेण्यात येऊन प्रमाणपत्रे देण्यात येतात. पांढरकवडा येथील रेणूका शिवणकला विद्यालय व नवयुवक बहुउद्देशीय संस्था यांचेकडील शिवणयंत्रांची संख्या प्रशिक्षणार्थी संख्येचा विचार करता फार कमी आहे. त्यामुळे प्रशिक्षणार्थींना सरावासाठी त्या फारच कमी वेळ उपलब्ध होतात.

तक्ता क्र.४.७

आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण/या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींची/लाभार्थींची जमातनिहाय वर्गवारी दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | आदिवासी जमातीचे नांव | शिवणकाम प्रशिक्षण (लाभार्थी संख्या) | शिलाई यंत्र वाटप (लाभार्थी संख्या) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | गोंड | १७ | ४ | २१ |
| २. | कोलाम | ३ | ३ | ६ |
| ३. | परधान | २२ | २ | २४ |
| ४. | आंध | - | १ | १ |
| | एकूण | ४२ | १० | ५२ |

शिवणकाम प्रशिक्षण योजनेअंतर्गत सर्वेक्षण करण्यात आलेल्या ४२ लाभार्थ्यांपैकी २२ परधान, १७ गोंड व ३ कोलाम जमातीचे होते. तसेच शिलाई यंत्र वाटप योजनेअंतर्गत दहा सर्वेक्षित लाभार्थ्यांपैकी ४ गोंड जमातीचे होते. त्यानंतर अनुक्रमे कोलाम, परधान व आंध जमातीच्या लाभार्थ्यांचा क्रम लागतो. शिलाई यंत्र वाटप योजनेतील लाभार्थींना जानेवारी, ९६ मध्ये (टेलर मॉडेल) शिवणयंत्राचे वाटप करण्यात आले. त्यापैकी सर्व मशीन सुस्थितीत आढळल्या. एका आदिवासी महिला लाभार्थीचा विवाह झाल्यामुळे तिच्याकडील मशीन गेली ३ महिने बंद आहे, असे दिसून आले. वाटप केलेल्या शिलाई

मशिनवर ब्लाऊज, स्कर्ट, पेटीकोट, परकर, जुन्या लुगड्यांना जोड देणे, लहान मुलांचे कपडे शिवणे इ.कामे लाभार्थी करीत असल्याचे पाहणीत आढळले.

तक्ता क्र.४.८

सर्वेक्षण करण्यात आलेल्या लाभार्थी कुटुंबातील साक्षरतेचे प्रमाण दर्शविणारा तक्ता

प्रकल्प-पांढरकवडा

| अ. क्र. | योजनेचे नांव | सर्वेक्षित केलेली कुटुंबे (संख्या) | एकूण सदस्य | | | साक्षर व्यक्ती | | | साक्षरतेचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| १. | शिवणकाम प्रशिक्षण | ४२ | ९४ | १४३ | २३७ | ३८ | ५१ | ८९ | ४० | ३६ | ३८ |
| २. | शिवणयंत्र वाटप | १० | २२ | २८ | ५० | १० | ११ | २१ | ४५ | ३९ | ४२ |
| | एकूण | ५२ | ११६ | १७१ | २८७ | ४८ | ६१ | ११० | ४१.३ | ३५.६ | ३८ |

सर्वेक्षण करण्यात आलेल्या आदिवासी लाभार्थींच्या कुटुंबात साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले. शिवणकाम प्रशिक्षण घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या कुटुंबातील पुरुष साक्षरतेचे प्रमाण ४० टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण फक्त ३६ टक्के आढळले. शिवणयंत्र वाटप योजनेतील आदिवासी लाभार्थ्यांच्या कुटुंबातील पुरुष साक्षरतेचे प्रमाण ४५ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ३९ टक्के आढळले. आदिवासी लाभार्थ्यांच्या कुटुंबातील पुरुष साक्षरतेचे प्रमाण ४५ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ३९ टक्के आढळले. आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांविषयी त्यांच्यामध्ये कमी जागरुकता दिसते. त्याचप्रमाणे योजनेचा लाभ घेण्यासाठी त्यांकडून करावयाच्या कागदपत्रांच्या पूर्ततेमध्ये विलंब होतो.

तक्ता क्र.४.९

आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण व शिलाई यंत्र वाटप या योजनेअंतर्गत सर्वेक्षण केलेल्या लाभार्थी कुटुंबांची जमीनधारणेनुसार वर्गवारी

| अ. क्र. | योजनेचे नांव | जमीन धारणेनुसार लाभार्थींची संख्या | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भूमीहिन | १ ते ५ एकर | | ६ ते १० एकर | | १० एकरापेक्षा जास्त | | एकूण | |
| | | | बागायत | जिरायत | बागायत | जिरायत | बागायत | जिरायत | बागायत | जिरायत |
| १. | शिवणकाम प्रशिक्षण | ३१ | - | ६ | - | ४ | - | १ | - | ११ |
| २. | शिवणयंत्र वाटप | ८ | - | - | - | - | - | २ | - | २ |
| | एकूण | ३९ | - | ६ | - | ४ | - | ३ | - | १३ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, योजनेचा लाभ घेतलेल्या आदिवासी कुटुंबामध्ये भूमीहिनांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ७५ टक्के आहे. पाच एकरापेक्षा कमी जिरायती जमीन असणारे ६ लाभार्थी, ६ ते १० एकरापर्यंत जिराईत, जमीन धारणा असणारे ४ लाभार्थी व त्यापेक्षा जास्त जिराईत जमीन असणारे ३ लाभार्थी पाहणीत निदर्शनास आले. बागायत क्षेत्र असलेला एकही लाभार्थी पाहणीत आढळून आला नाही.

वरील परिस्थितीमुळे असे नमूद करावेसे वाटते की, योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये भूमीहीन व अल्पभूधारक कुटुंबांची संख्या मोठी आहे व त्यामुळे त्यांचा योजनेतील प्रतिसाद चांगला आहे.

तक्ता क्र.४.१०

आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण व शिलाई यंत्र वाटप या योजनेअंतर्गत सर्वेक्षण केलेल्या लाभार्थ्यांकडे असलेल्या पशुधनाची माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | योजनेचे नांव | कुटुंब संख्या | जमीन धारणेनुसार लाभार्थींची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गाई | बैल | म्हशी | रेडे | शेळ्या | कोंबड्या | बदके | डुकरे |
| १. | शिवणकाम प्रशिक्षण | ४२ | ५ | १४ | - | - | २३ | १२ | | |
| २. | शिवणयंत्र वाटप | १० | ८ | २ | - | - | १० | - | - | - |
| | एकूण | ५२ | १३ | १६ | - | - | ३३ | १२ | - | |

तक्ता क्र.४.९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे या योजनेत सहभागी झालेल्या कुटुंबात भूमीहीन कुटुंबाचे प्रमाण जास्त असल्याने, चाऱ्याच्या उपलब्धते अभावी सदरील लाभार्थी कुटुंबाकडे असणाऱ्या मोठ्या पशुधनाचे प्रमाण अल्प आहे. तसेच त्यांच्याकडे असणाऱ्या पशुधनात शेळ्यांची संख्या तुलनेने जास्त आढळली. त्या खालोखाल बैल, गाई, कोंबड्या या पशुधनाचा क्रम लागतो. असे निदर्शनास आले की, शिवणकाम प्रशिक्षण योजनेकडे शालेय आदिवासी विद्यार्थ्यांनीचा ओढा जास्त असून त्यामुळे शिवणकला ही त्यांच्यामध्ये जोपासली जात आहे. यासाठी फावल्या वेळाचा सदुपयोग होत असतांना दिसत आहे. 'शिलाई यंत्र वाटप' योजनेमुळे घरकाम सांभाळून फावल्या वेळात शिलाई काम करुन महिला आदिवासी लाभधारक कुटुंबाच्या उत्पन्नात थोडाफार हातभार लावतात, असे पाहणीत आढळून आले.

तक्ता क्र.४.११

आदिवासींना शिवणकाम प्रशिक्षण व शिलाई यंत्र वाटप या योजनेअंतर्गत सर्वेक्षण केलेल्या लाभार्थ्यांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारा तक्ता

प्रकल्प - पांढरकवडा

| अ. क्र. | योजनेचे नांव | वार्षिक उत्पन्नानुसार लाभार्थी कुटुंबाचे वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | रु.५०००/-पर्यंत उत्पन्न असणारी लाभार्थी कुटुंब | रु.५००१/-ते १०००० पर्यंत उत्पन्न असणारी लाभार्थी कुटुंब | रु.१०००१ /-ते १८०००/- पर्यंत उत्पन्न असणारी लाभार्थी कुटुंब | एकूण लाभार्थी कुटुंबे |
| १. | शिवणकाम प्रशिक्षण | - | १९ | २३ | ४२ |
| २. | शिवणयंत्र वाटप | - | ७ | ३ | १० |
| | एकूण | - | २६ | २६ | ५२ |

या योजनेत सहभागी झालेल्या व सर्वेक्षण केलेल्या आदिवासी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार केला असता असे निदर्शनास येते की, भूमीहीन कुटुंबांचे उपजिविकेचे मुख्य साधन म्हणजे मोलमजूरी, शेतमजूरी किंवा नोकरी असेच आहे. भूमीधारक लाभधारकांकडे असणारी संपूर्ण जमिन जिरायती असून केवळ पावसाच्या पाण्यावर पिकणारी आहे. त्यामुळे अशा लाभार्थींचे उपजिविकेचे मुख्य साधन, पावसाळ्यात शेती व इतर वेळी मोलमजूरी इ.आहे. पाहणीमध्ये पाच ते दहा हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असणारी व दहा हजार ते अठरा हजार रुपयेपर्यंत उत्पन्न असणाऱ्या लाभार्थी कुटुंबांची टक्केवारी प्रत्येकी ५० टक्के इतकी आढळली. शिवणयंत्र वाटप योजनेतील लाभार्थी कुटुंबांच्या उत्पन्नात दिलेल्या शिवणयंत्रामुळे दरमहा सरासरी रु.१५० पासून ते ३०० रुपयांपर्यंत भर पडत असल्याचे लाभार्थींकडून समजले. याशिवाय घरी शिवणयंत्र असल्याने लहान मुलांचे कपडे व इतर कपडे घरच्या घरी शिवल्यामुळे बाहेर द्यावा लागणारा शिलाई खर्च वाचत असल्याचे त्यांनी सांगितले.

४.३ क्षेत्रीय पाहणी अंतर्गत निवडलेल्या लाभार्थींच्या प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उपलब्ध झालेली माहिती, योजना अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय त्याचप्रमाणे सन १९९५-९६ मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविलेल्या योजनांवर झालेला खर्चाचे विश्लेषण केले असता इतर खालील मुद्दे निदर्शनास आले.

४.३.१ केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत आदिवासींच्या विविध वैयक्तिक गरजांवर आधारीत अनेक महत्वाच्या योजना राबविण्यात येत असून त्यानुसार सन १९९५-९६ मध्ये राबविण्यात आलेल्या योजनांची संख्या १२९ इतकी होती.

या योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, सन १९९५-९६ मध्ये अशाप्रकारच्या योजनांसाठी राज्यात एकूण ५ कोटी २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. तसेच शिवणकाम प्रशिक्षण योजनेसाठी सन १९९५-९६ मध्ये १५.४५ लाख रुपये खर्च करण्यात आला असून शिवण यंत्र वाटप योजनेसाठी ९.३४ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. या योजनेतील लाभार्थींची संख्या अनुक्रमे ११७ व ५१३ इतकी होती.

४.३.२ आदिवासीमधील निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याने शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची त्यांना नीट माहिती होत नाही. तसेच पाहणीत असेही आढळून आले की, पैसे भरुन योजनेचा लाभ घेण्यास आदिवासी फारसे उत्सुक नसतात. त्यामुळे आर्थिक सहभाग असणाऱ्या योजनांना आदिवासींचा कमी पाठींबा मिळतो.

४.३.३ शिवणकाम प्रशिक्षण योजनेमध्ये प्रशिक्षणार्थींची संख्या जास्त व त्यामानाने सरावासाठी उपलब्ध असलेल्या शिवणयंत्राची संख्या कमी असल्याने प्रशिक्षणार्थींना सरावासाठी शिवणयंत्र कमी वेळ मिळत असल्याचे आढळून आले. तसेच काही ठिकाणी जागेची कमतरता आढळली.

४.३.४ 'शिवणयंत्र वाटप' योजनेतील लाभार्थींना दरमहा मिळणाऱ्या कमी उत्पन्नाची कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे-

अ. आधुनिक फॅशनचे कपडे शिवता न येणे

ब. लोकांचा कल आठवडा बाजारातून किंवा दुकानातून तयार कपडे विकत घेण्याकडे असणे

क. रोजंदारीवर मिळणाऱ्या जास्त मजूरीमुळे शिवणकामाकडे दुर्लक्ष होणे

ड. घरकामामुळे शिवणकामासाठी पुरेसा वेळ न मिळणे इ.

४.३.५ शिवणकला प्रशिक्षण संस्थांकडून घेतलेल्या माहितीमध्ये आढळलेल्या प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे

प्रशिक्षणासाठी हजर झालेल्या एकूण आदिवासी प्रशिक्षणार्थींपैकी सर्वसाधारणपणे पंचाहत्तर टक्के लाभार्थी यशस्वी रितीने प्रशिक्षण पूर्ण करतात. इतरांच्या बाबतीत गैरहजेरीचे प्रमाण जास्त असते. तसेच इयत्ता १० वी ते १२ वी दरम्यान शिक्षण असलेल्या विद्यार्थीनी प्रशिक्षणात रस घेतात. इ.७ वी ते १० दरम्यान शिकत असलेल्या किंवा शाळा सोडून घरी बसलेल्या विद्यार्थीनीना मोजमाप घेणे, कापड बेतणे इ.गोष्टींचे आकलन व्हायला वेळ लागतो.

४.३.६ शिवणकाम प्रशिक्षण योजनेअंतर्गत पांढरकवडा प्रकल्प कार्यालयामार्फत पुरस्कृत उमेदवारास दरमहा रु.२५०/- मानधन देण्यात येते. त्याचप्रमाणे प्रशिक्षण संस्थेला प्रत्येक पुरस्कृत विद्यार्थ्यामागे प्रशिक्षण शुल्क, स्टेशनरी, दोरे, कापड, बॉबीन इ.साठी दरमहा रु.१७५/- अदा करण्यात येतात. या सर्व संस्थांचा प्रशिक्षण सत्र कालावधी सहा महिन्यांचा असून पुरस्कृत उमेदवारांना जानेवारी ते जून दरम्यान प्रशिक्षण देण्यात येते.

योजना अंमलबजावणी अधिकारी, शिवणकला प्रशिक्षणार्थी, शिवणयंत्र मिळालेले लाभार्थी, शिवणकला प्रशिक्षण केंद्राचे संचालक यांच्याशी केलेली चर्चा तसेच प्रकल्प कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेली प्राथमिक माहिती व क्षेत्रीय पाहणीत गोळा करण्यात आलेली सांख्यिकी माहिती इ.च्या आधारे या योजनेबाबत करावयाच्या सूचना तथा शिफारशी यावर सविस्तर उहापोह पुढील प्रकरणात करण्यात आलेला आहे.

प्रकरण क्र.५

# सूचना तथा शिफारशी

केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत (Nuclues Budget) राबविण्यात येणाऱ्या अनेक योजनांपैकी 'आदिवासींना शिवणकला प्रशिक्षण व शिवणयंत्राचे वाटप' ही एक वैयक्तिक लाभाची योजना आहे. राज्यातील विविध एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत आदिवासींचा, मुख्यत: आदिवासी महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते. या योजनेमुळे लाभधारकांना निश्चित आर्थिक फायदा झाल्याचे पाहणीत दिसून आले. तथापि, पाहणीअंती निदर्शनास आलेल्या योजनेतील काही त्रुटी लक्षात घेता व ही योजना अधिक चांगल्या प्रकारे राबविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना करण्यात येत आहेत.

५.१ आदिवासींमधील निरक्षरता, मागासलेपणा, बुजरेपणा यामुळे त्यांना त्यांच्या कल्याणासाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती होत नाही. याकरिता निरनिराळ्या प्रसार माध्यमांद्वारे शासकीय योजनांचा प्रसार होणे आवश्यक आहे. तसेच आदिवासी समाजातील साक्षरतेचे प्रमाण वाढविणेही तितकेच आवश्यक आहे. यासाठी आदिवासींच्या कल्याणासाठी झटणाऱ्या 'स्वयंसेवी संस्था' महत्वाची भूमिका बजाऊ शकतात.

५.२ ' शिवणकाम प्रशिक्षण' योजनेतील प्रशिक्षण सत्रासाठी सद्या असलेला सहा महिन्यांचा कालावधी अपुरा असून त्यामुळे प्रशिक्षणार्थींना शासकीय परीक्षेला बसवता येत नाही. कारण अशा परीक्षेला बसण्यासाठी किमान नऊ ते दहा महिने प्रशिक्षण घेणे आवश्यक असते. तसेच सद्यांचा प्रशिक्षणाचा कालावधी कमी असल्याने प्रशिक्षणार्थींना सरावासाठी आवश्यक असणारा पुरेसा वेळ मिळत नाही. शिवाय कमी कालावधीत घेतलेल्या जुजबी प्रशिक्षणामुळे त्यांना आधुनिक फॅशनचे कपडे शिवता येत नाही. यासाठी शिवणकाम प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षण सत्रांचा कालावधी वाढवून नवीन पध्दतीचे कपडे

शिवण्याचे प्रशिक्षण लाभार्थींना देणे गरजेचे आहे. तसेच रोजच्या प्रशिक्षणासाठी सरावाची वेळ वाढवून ती किमान रोज चार तास करावी, म्हणजे लाभार्थींना जास्त वेळ सरावास मिळेल.

५.३ प्रशिक्षणासाठी एखाद्या संस्थेला आदिवासी प्रशिक्षणार्थी पाठविण्यापूर्वी त्या संस्थेकडे असलेल्या शिवणयंत्रांची संख्या प्रकल्प कार्यालयाने विचारात घेणे गरजेचे आहे. प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षणार्थींच्या मानाने शिवणयंत्रे कमी असल्यास शिवणयंत्रांची संख्या वाढविल्याशिवाय प्रशिक्षणार्थी पाठवू देऊ नयेत, असे वाटते. कारण अशा प्रकारात प्रशिक्षणार्थींना अपुऱ्या शिलाई यंत्रामुळे सरावासाठी मिळणारा कालावधी अतिशय अल्प असून त्यामुळे प्रशिक्षणार्थी मध्ये योग्य गुणवत्ता व कौशल्य येणे कठीण वाटते. तसेच जो संस्था चालक स्वत: शिवणकला पदविकाधारक आहेत, अशा संस्थांनाच प्रशिक्षणासाठी प्राधान्य द्यावे.

५.४ प्रशिक्षणासाठी देण्यात येणारी कच्च्या मालाची रक्कम प्रकल्प कार्यालयामार्फत संबंधित संस्थांना दरमहा नियमितपणे प्राप्त होणे आवश्यक आहे. कारण सरावासाठी कापड, दोरा व इतर तत्सम साहित्य उपलब्ध करुन देणे संबंधित संस्थांना सोपे होते. प्रशिक्षणासाठी लागणारा कच्चा माल तसेच इतर स्टेशनरी वस्तु स्वरुपात पुरविता येणे शक्य असेल तर ते योग्यच होईल.

५.५ पाहणीच्या कालावधीमध्ये एक प्रशिक्षण संस्था सात दिवसांपेक्षा जास्त काळ बंद असल्याचे आढळले. प्रकल्प कार्यालयाने अशा प्रकारात लक्ष घालून संबंधित संस्था चालकांस पर्यायी व्यवस्था करुन संस्था सुरु ठेवण्याविषयी कार्यवाही करावयास भाग पाडणे गरजेचे आहे. अन्यथा अशा प्रकारात प्रशिक्षणार्थींचे एकत्रितपणे नुकसान होते. यासाठी प्रशिक्षण सत्र कालावधीत प्रकल्प कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी वेळोवेळी किंवा अचानक संस्थेला भेट देणे उचित होईल.

५.६ बऱ्याच शिवणकाम प्रशिक्षणार्थींच्या मते त्यांना केवळ शिलाई कामाचे प्रशिक्षण देऊन भागणार नाही तर त्यांना शिलाई मशीनही देण्यात यावी. प्रशिक्षण कालावधी

संपल्यानंतर घरी शिवणयंत्र नसल्यास सराव करता येत नाही. तसेच कपडे शिवण्याची कामे देखील घेता येत नाहीत. म्हणून उत्तमरितीने प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या गुणवत्ता प्राप्त होतकरु प्रशिक्षणार्थींना प्रकल्प कार्यालयामार्फत शिवणयंत्रे मिळाल्यास घेतलेल्या प्रशिक्षणाचा योग्य उपयोग करता येणे शक्य आहे.

५.७ शिवणकाम प्रशिक्षण योजनेसाठी घाटंजी, राळेगांव, दिग्रस, दारव्हा व पुसद तालुक्यातील लाभार्थ्यांची संख्या कमी असण्याचे मुख्य कारण म्हणजे शिवणकाम प्रशिक्षण संस्थांचा अभाव हे आहे. म्हणून या तालुक्याच्या ठिकाणी शिवणकाम प्रशिक्षण केंद्रासाठी आदिवासी प्रशिक्षित उमेदवारांना उत्तेजन देऊन शिवणकला प्रशिक्षण केंद्र सुरु केल्यास आजूबाजूच्या गांवातील प्रशिक्षणार्थी या केंद्रात प्रशिक्षण घेऊ शकतील.

५.८ या योजनेसाठी आदिवासींचा सहभाग चांगला असून देखील सन १९९५-९६ पेक्षा सन १९९६-९७ मध्ये जादा आर्थिक तरतूदीअभावी लाभार्थी संख्येत कपात करावी लागली. तेव्हा या योजनेसाठी दरवर्षी पुरेशी आर्थिक तरतुद प्राप्त होणे गरजेचे वाटते.

५.९ यवतमाळ जिल्हयातील कोलाम या आदिम जमातीच्या लाभार्थींची संख्या या योजनेसाठी इतर जमातीच्या लाभार्थ्यांपेक्षा कमी आढळते. विशेषत: शिवण यंत्र वाटप योजनेत त्यांना ८०% अनुदानावर यंत्र पुरविण्यात येत असून देखील यांचा सहभाग कमी आढळतो. हा सहभाग वाढविण्यासाठी प्रकल्प कार्यालयामार्फत प्रयत्न होणे आवश्यक वाटते. त्यासाठी कोलाम जमातीच्या पुढाऱ्यांमार्फत या योजनेच्या लाभ घेण्यासाठी त्यांची मने वळविणे उचित होईल.

५.१० शिवणयंत्र वाटप योजनेमध्ये लाभार्थींना शिवणयंत्रे पुरवितांना सोबत नवीन फॅशनचे कपडे शिवण्याबाबत मार्गदर्शन करणारी सचित्र पुस्तके मोफत पुरविण्यात आल्यास लाभार्थींना अभ्यास करुन त्या आधारे नवीन प्रकारचे कपडे शिवणे शक्य होईल व त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास हातभार लागेल. अशा प्रकारची पुस्तके शिवणकाम प्रशिक्षण योजनेसाठी देखील पुरविणे गरजेचे आहे.

५.११ शिवणयंत्र वाटप योजनेतील लाभार्थ्यांच्या मते शिवणयंत्राचे वाटप आश्रमशाळेवर न करता त्यांच्या राहत्या गांवी केल्यास त्यांचा वाहतुकीचा खर्च टळू शकेल. तसेच

योजनेसाठी करावयाच्या कागदपत्रांची पूर्तता जवळच्या शासकीय आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांकडून करुन घेतल्यास त्यांना प्रकल्प कार्यालयात प्रत्येक वेळी यावे लागणार नाही व प्रवास खर्चात बचत होईल. कारण यवतमाळ जिल्हयाचा विस्तार मोठा असल्याने प्रत्येक वेळी प्रकल्प कार्यालयात जाण्यासाठी मोठी रक्कम खर्च होते. तसेच वेळेचाही अपव्यय होतो.

५.१२ केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत प्रकल्प कार्यालयामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. तसेच योजना राबविण्यासाठी मोठा निधी खर्च केला जातो. परंतू बऱ्याचदा अपूऱ्या कर्मचाऱ्यामुळे राबविलेल्या योजनांचे मूल्यमापन प्रकल्प कार्यालयाकडून केले जात नाही. त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाचा त्यांना रोजगार निर्मितीसाठी खरोखर उपयोग होऊ शकला किंवा कसे , तसेच उत्पन्न निर्मितीच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थींच्या उत्पन्नात राबविलेल्या योजनामुळे निश्चित किती भर पडली यांचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. यासाठी एकाच कार्यालयात वाटल्यास जादा कर्मचाऱ्यांची पदे शासनाकडून मंजूर करण्यात यावीत.

५.१३ शिवणकाम प्रशिक्षण कालावधीत, आदिवासी प्रशिक्षणार्थींना या व्यवसायाचे चांगले ज्ञान व्हावे, यासाठी शहरी भागातील चांगल्याला 'टेलरिंग फर्म' वर त्यांच्या अभ्यास सहली काढण्यात याव्यात., जेणेकरुन त्या फर्मस मधील सुधारीत तंत्रज्ञानाचा त्यांना अभ्यास करता येईल व धंद्यातील कसब ते आत्मसात करु शकतील व नवीन पध्दतीचे कपडे शिवू शकतील. अशा अभ्यास सहलीसाठी वाटल्यास त्यांच्या मानधन रक्कमेत वाढ करण्यात यावी.

५.१४ ज्या आदिवासी लाभार्थींना शिलाई यंत्राचे वाटप केले गेले आहे, अशा व्यक्तींना, त्यांची इच्छा असल्यास शासकीय आश्रमशाळेतील मुलांचे गणवेष शिवण्याचे काम प्राधान्याने देण्यात यावे. यामुळे त्यांना खात्रीशीर काम मिळून चरितार्थ चालविण्यासाठी आवश्यकतो आर्थिक मोबदला मिळू शकेल.

५.१५ उपरोक्त शिफारशी अंमलात आणल्यास विषयाधीन योजना अधिक प्रभावीपणे राबविली जाईल. असे वाटते.

## परिशिष्ट - १

### (अ) केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची सूची

रोजगार निर्मिती/उत्पन्न निर्मिती योजना

१. शिवणयंत्र खरेदीसाठी अर्थसहाय्य

२. मेणबत्ती उद्योगासाठी अर्थसहाय्य

३. खडू उद्योगासाठी अर्थसहाय्य

४. कुक्कुटपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य

५. शेतकऱ्यांना पी.व्ही.सी.पाईप पुरविणे

६. वराहपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य

७. बेंजोसंच खरेदीसाठी अर्थसहाय्य

८. पडिक जमिनीचा विकास करण्यासाठी अर्थसहाय्य

९. वीट उत्पादकांना अर्थसहाय्य

१०. तुरडाळ प्रक्रीया करणाऱ्या उद्योगांना अर्थसहाय्य

११. रास्तभाव दुकानासाठी अर्थसहाय्य

१२. किराणा दुकानासाठी अर्थसहाय्य

१३. आदिवासी कारागिरांना सुतार कामांच्या साहित्याचे वाटप

१४. आदिवासींना शेळीपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य

१५. आदिवासींना सिंट्रेला गवत लागवडीसाठी अर्थसहाय्य

१६. आदिवासी कारागिरांना बुरुड कामासाठी अर्थसहाय्य

१७. आदिवासी भाजीपाला व्यावसायिंकासाठी अर्थसहाय्य

१८. आदिवासींना सुकीमासळी व्यवसायासाठी अर्थसहाय्य

१९. आदिवासी युवकांना लाऊडस्पीकर खरेदीसाठी अर्थसहाय्य

२०. पत्रावळी तयार करण्यासाठी अर्थसहाय्य

२१. आदिवासी मच्छिमारांना जाळी खरेदीसाठी अर्थसहाय्य

२२. आदिवासी युवकांना लघुउद्योगासाठी अर्थसहाय्य

२३. बांबू लागवडीसाठी अर्थसहाय्य

२४. घोडा व्यवसायासाठी अर्थसहाय्य

२५. दुधदुभत्यांच्या व्यवसायासाठी अर्थसहाय्य

२६. वनौषधी निर्मिती करणाऱ्या आदिवासी संस्थेस तेलपंप/वीजपंप घेण्यासाठी अर्थसहाय्य

२७. आदिवासी शेतकऱ्यांना तुती कलमे लागवडीसाठी अर्थसहाय्य

२८. आदिवासी महिलांना पापड उद्योगासाठी अर्थसहाय्य

२९. राष्ट्रीय गळीत धान्य विकास कार्यक्रम व तुषार ठिबक संच वाटप

३०. आदिवासी क्षेत्रात एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम / भात खाचरे विकास कार्यक्रम

३१. आदिवासी महिलांच्या बचत गटातर्फे करवंद / जाम लोणच्याचा नियोजित प्रकल्प राबवणे

३२. मिनी चक्कीसाठी (पिठाची गिरणी) अर्थसहाय्य

३३. लाकूड कटाई साहित्य घेणे कामी आदिवासींना आर्थिक मदत

३४. ५० टक्के अनुदानावर बैलगाडी व बैलजोडी पुरवठा करण्याची योजना

३५. भाकड गाभण म्हशींचा पुरवठा

३६. आदिवासींना मळणी यंत्र खरेदीसाठी अर्थसहाय्य

३७. रोजगार हमी योजनेंतर्गत आंबा कलम, काजू कलम, जांभूळ, आंबा, कोच लागवड केलेल्या लाभार्थींना ब-८ बाबी खाली अर्थसहाय्य

३८. विहिर खोली करणासाठी आर्थिक मदत

३९. उपसा जलसिंचन योजनेसाठी आर्थिक मदत

४०. मिनिट्रक घेण्यासाठी अर्थसहाय्य

४१. एक वर्ष वयाच्या पारड्यांना वाहतुक खर्च अनुदान

४२. शेत नांगरणीसाठी ट्रॅक्टरचा वापर करण्यासाठी अर्थसहाय्य

(ब) केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाच्या योजना

१. हलके व जड वाहनचालक प्रशिक्षण

२. खडू व मेणबत्ती तयार करण्याचे प्रशिक्षण

३. बालवाडी चालविण्यासाठी प्रशिक्षण.

४. टंकलेखन प्रशिक्षण.

५. एम.पी.एस.सी.परीक्षेसाठी मार्गदर्शक वर्ग.

६. रंगकाम प्रशिक्षण.

७. आश्रमशाळेतील गणित, इंग्रजी, विज्ञान विषयाच्या शिक्षकांना प्रशिक्षण.

८. आदिवासी गवंड्यांना बायोगॅस बांधकाम प्रशिक्षण.

९. आदिवासी तरुणांना बहुउद्देशीय आरोग्याचे प्रशिक्षण.

१०. आदिवासी तरुणांना एस.टी.वाहक प्रशिक्षण.

११. शासकीय वसतीगृहातील मुलींना शिवणकामाचे प्रशिक्षण.

१२. विद्यार्थ्यांचे उजळणी वर्ग घेणे.

१३. हातपंप दुरुस्ती प्रशिक्षण.

१४. आरोग्य सेवापूर्व प्रशिक्षण.

१५. रेशीम उद्योग प्रशिक्षण.

१६. वेतकामाचे प्रशिक्षण.

१७. आदिवासी स्त्रियांना दाईचे प्रशिक्षण देणे.

१८. आदिवासींना इलेक्ट्रॉनिक साहित्य निर्मितीचे प्रशिक्षण.

१९. आदिवासी उमेदवारांना बँक भरतीपूर्व प्रशिक्षण देणे.

२०. आश्रमशाळेतील स्वयंपाकी / कामाठी यांना स्वयंपाकांचे प्रशिक्षण.

२१. चयन आयोगाद्दारे घेण्यात येणाऱ्या लिपिक वर्गीय परीक्षेसाठी अभ्यास वर्ग आयोजित करणे.

२२. आदिवासी युवकांना मोटार सायकल दुरुस्ती प्रशिक्षण.

२३. आदिवासी युवकांना कार्यालयीन कामाचे प्रशिक्षण.

२४. मराठी लघुलेखन प्रशिक्षण.

२५. आदिवासी शेतकऱ्यांना काजू, आंबा लागवड विषयक प्रशिक्षण.

२६. आदिवासी तरुणांना मधमाशी पालन प्रशिक्षण.

२७. आदिवासी तरुणांना डाळींब लागवडीसाठी प्रशिक्षण.

२८. हस्तकला व्यवसाय प्रशिक्षण.

२९. सुतार कामाचे प्रशिक्षण.

३० आदिवासी तरुणांना वायरमन प्रशिक्षण.

३१. आदिवासी तरुणांना टेपरेकार्ड व रेडिओ दुरुस्ती प्रशिक्षण.

३२. आदिवासी युवकांना दूरदर्शन संच दुरुस्ती प्रशिक्षण.

३३. आदिवासी युवकांना भरतीपूर्व प्रशिक्षण ( पोलीस, एस.आर.पी. सैन्य इत्यादी)

३४. आदिवासी युवकांना कॉम्प्युटर प्रशिक्षण.

३५. आदिवासी युवकांना हॅड कंपोझिंग, बाईडिंग प्रशिक्षण देणे.

३६. आदिवासी तरुणांना फोटोग्राफीचे प्रशिक्षण.

३७. आदिवासी तरुणांना कॅनॉल इन्सपेक्टर प्रशिक्षण.

३८. आदिवासी विद्यार्थ्यांना टेलिफोन ऑपरेटरचे प्रशिक्षण.

३९. आदिवासी महिलांना परिचारिका प्रशिक्षण देणे.

४०. आदिवासी तरुणांना वेल्डींगचे प्रशिक्षण.

४१. आदिवासींना माळीकाम प्रशिक्षण.

४२. आदिवासींना मोटार रिवाईडींगचे प्रशिक्षण.

४३. आदिवासी महिलांना गालिचा विणकाम प्रशिक्षण.

४४. आदिवासी महिलांना भरतकामाचे प्रशिक्षण.

(क) मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना

१. आदिवासी कलामहोत्सव व सांस्कृतिक नृत्य मेळावे आयोजित करणे.

२. मुख्याध्यापकांची शिबिरे व शिक्षकांचे उद्बोधन प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.

३. भजन मंडळांना भजन साहित्य पुरविणे.

४. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे.

५. आदिवासींचे सामुदायिक विवाह आयोजित करुन अर्थसहाय्य करणे.

६. आदिवासींचे स्वास्थ्य सुधारणा कार्यक्रमास आर्थिक मदत व शिबिरे आयोजित करणे.

७. आदिवासींच्या मानसिक व शारिरीक विकासासाठी व्यसनमुक्ती मेळावे आयोजित करणे.

८. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी मेळावे आयोजित करणे.

९. आदिवासींच्या शेतकरी मेळाव्यांसाठी अर्थसहाय्य करणे.

१०. १० वी नापास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष उजळणी वर्ग आयोजित करणे.

११. आदिवासींच्या कलापथकांना आर्थिक मदत करणे.

१२. आदिवासी विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी वादविवाद स्पर्धा आयोजित करणे.

१३. साक्षरता मोहिम व सुसंस्कार केंद्र.

१४. आदिवासी मेळाव्याचे आयोजन करणे व मेळाव्यातील सहभागी आदिवासींना जनता साडी व धोतर संच यांचे वाटप.

१५. आदिवासी लाभार्थ्यांना नोकरी / शिक्षण मुलाखतीस उपस्थित राहण्यासाठी अर्थसहाय्य.

१६. शासकीय आश्रमशाळेवर पालक मेळावे आयोजित करणे.

१७. शासकीय आश्रमशाळा स्तरावर क्रीडा व नैपुण्यवान विद्यार्थ्यांचे संशोधन करण्यासाठी क्रीडा शिबिरे आयोजित करणे.

१८. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या आदिवासी युवकांना अर्थसहाय्य करणे.

१९. शासकीय आश्रमशाळांना रंगीत दूरदर्शन संच ( डिश अँटेनासह ) पुरवठा करणे.

२०. आदिवासी सुशिक्षित युवकांना सायकल व दोन बँड रेडिओचा पुरवठा करणे.

२१. शासकीयआश्रमशाळा स्तरावर ग्रंथालयीन पुस्तकांचा पुरवठा करणे

२२. नक्षलवादी क्षेत्रातील लोकांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे

२३. सिमीत परिवार ( परिसीमा ) योजना ( एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली )

(ड) कल्याणात्मक योजना

१. बालवाडीसाठी खेळणी पुरविणे.

२. आदिवासी अपघात ग्रस्तांना सहाय्य.

३. आदिवासींना तातडीच्या शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य.

४. आदिवासी जोडप्यांना संसारोपयोगी वस्तुंचा पुरवठा.

५. आदिवासींच्या घरांना विद्युत मीटरसाठी अनुदान तसेच वीज पॉईंट फिटींग करणे.

६. आदिवासी आपदग्रस्तांना अर्थसहाय्य.

७. आदिवासींसाठी पिण्याच्या पाण्याच्या सोयी उपलब्ध करुन देणे.

८. आदिवासी अपंगांना तीन चाकी सायकल पुरविणे.

९. आदिवासींना घरबांधणीसाठी बांबु पुरविणे.

१०. कुपोषणामुळे बालमृत्यु झालेल्या व्यक्तींच्या कुटुबांना व ग्रेड ३ व ४चे बालकांच्या पालकांना १ पोते ज्वारी, २५ किलो तुरदाळ व २५ किलो चनाडाळ पुरविण्याची योजना.

११. कुपोषण ग्रस्तांना औषधोपचार व व्हिटॅमिन्सचा पुरवठा करणे.

१२. कुपोषणग्रस्तांच्या आईवडिलांना जेवण देणे.

१३. मूकबधिर विद्यालयातील मुला-मुलींना श्रवणयंत्रे पुरविणे.

१४. अंगणवाडीत देण्यात येणाऱ्या खिचडींवर तेल, मीठ, हळद, मोहरी देणे.

१५. अंगणवाडी केंद्रावर दूध व खिचडी तयार करण्यासाठी भांडी देणे.

१६. दूधाच्या पावडरचे वाटप.

१७. आदिवासींच्या घरांना टिनपत्रे पुरवणे.

१८. आदिवासी होतकरु खेळाडूंना अर्थसहाय्य.

१९. पावसाळयात नदीवरुन ये-जा करणाऱ्या आदिवासींना डोंगे पुरविणे.

२०. आदिवासी विद्यार्थ्यांकरिता धनुर्विद्या प्रशिक्षणासाठी धनुर्विद्या साहित्य पुरवठा करणे.

| | योजनेचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| अ. | रोजगार निर्मिती / उत्पन्न निर्मिती योजना | ४२ |
| ब. | प्रशिक्षणाच्या योजना | ४४ |
| क. | मानवी साधन संपत्ती विकासाच्या योजना | २३ |
| ड. | कल्याणात्मक योजना | २० |
| | एकूण | १२९ |